सं. फौ. ख. क्र.४७६/२०१८ निशाणी १८

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांचा शपथेवर जबाब**
**मी सत्यप्रतिज्ञेवर कथन करते/करतो की,**

नाव – श्रीकृष्ण गणेशराव वाकोडे

वय – ४६ वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर,

पत्ता – रा. बाभडी, ता. दर्यापुर, जि. अमरावती

**सरकारतर्फे सरकारी वकिल श्रीमती फौजिया तबस्सुम अब्दुल सादिक यांचे मार्फत सरतपास सुरुः**

१. दि.०६.१२.२०१७ रोजी मी रात्री १० ते १०.३० वा. सुमारास अकोला येथून बाळापूर येथे येण्याकरीता माझ्या ताब्यातील महिंद्रा बोलेरो पिकअप वाहन क्र.एम.एच.२७/बी.एक्स./७६०३ ही घेवून जात होतो. मी बाळापूरच्या दिशेने येत असताना रिलायन्स पेट्रोल पंपांच्याजवळ पोहोचलो असता बाळापूर कडून एक भरधाव वेगाने ट्रक अकोल्याच्या दिशेने जात होता. तो ट्रक मी चालवित असलेल्या वाहनास माझ्या गाडीच्या कॅबीनच्या पाठीमागील बाजूस धडक दिली. सदर धडकेमुळे माझी गाडी रस्त्यावर डाव्या बाजूला पडली. तसेच मी चालवित असलेल्या वाहनास धडक मारणारा ट्रक हा अर्धा किमी पुढे जावून शेतामध्ये पडला. सदर धडकेमुळे माझ्या उजव्या पायाला खालील घोट्यास दुखापत झाली तसेच डाव्या हाताच्या कोपरास मार लागला होता तसेच माझ्या चेहऱ्यास डाव्या बाजूला मार लागला होता. तसेच माझ्या वाहनामध्ये असलेले संत्र्याचे कॅरेट यांचे नुकसान झाले. सदर घटनेबाबत मी बाळापूर पो.स्टे. येथे फिर्याद दिली होती.

२. आता मला सदर फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येत आहे. आता मला छापील फिर्याद दाखविण्यात आली त्यावर माझी सही असून त्यातील संपुर्ण मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. ज्या ट्रकने माझ्या वाहनास धडक दिली त्याचा क्रमांक मला आता आठवत नाही, कारण मी तो पाहिलाच नव्हता. तसेच सदर ट्रक चालविणारा चालक कोण होता, हे देखील मला माहित नाही. सदर घटनेबाबत पोलीसांनी माझी चौकशी केली होती.

(<u>साक्षीदार अभियोग पक्षास पुरक साक्ष देत नसल्याकारणाने त्याचा उलटतपास घेण्याची परवानगी देण्यात येत आहे.</u>)

३. माझ्या वाहनास धडक मारणारा ट्रकचा क्र.एम.एच.३०/बी.डी./७७७ हा होता तसेच त्याचा चालक नामे सलीम खान हा होता, याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघातानंतर तेथे रुग्णवाहिका आली होती. सदर अपघातामध्ये ट्रकमधील शे. साजीद शे. वजीर यास दुखापत होवून त्याचा मृत्यु झाला होता, याबाबत मला माहित नाही.

सरतपास पूर्ण.

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. ए. जी. अवातिरक यांच्या मार्फत उलटतपासः</u>**

४. हे म्हणणे खरे आहे की, सदर अपघाताबाबतची फिर्याद पोलीसांनी मला वाचून दाखविली नाही व मी देखील ती वाचून पाहिली नाही, त्यामुळे त्यातील मजकूर मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझा जबाब कधीही घेतला नाही.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास नाही.

**दिनांकः– २६.११.२०२५**

**श्रवणोत्तर निवेदन स्विकृत**

DAYANAND MARUTI WAGHMARE
Digitally signed by DAYANAND MARUTI WAGHMARE
Date: 2025.11.26 15:05:16 +0530

**(डी. एम. वाघमारे)**
**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**(न्यायालय क्र.२), बाळापूर.**

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :– | **श्री. डी. एम. वाघमारे,**<br>सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, व प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, बाळापूर. |
| लघुलेखकाचे नाव | :– | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :– | २६/११/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :– | २६/११/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :– | २६/११/२०२५ |